छाटणी (प्रुनिंग)-

वेलीची वाढ एकसारखी होण्यासाठी, पानाचा आकार मोठा, कीड व रोगास वेलाची प्रतिकारक्षमता वाढविण्यासाठी नको असलेला वेलीचा भाग म्हणजेच मध्यभागाचा शेंडा व अनावश्यक बगल फुटी छाटून टाकाव्यात. छाटणी केल्यामुळे फळांचा आकार, रंग, चव, आकर्षकपणा व वजन यामध्ये फायदेशीर बदल होतो.

पाणी व्यवस्थापन-

ठिबक सिंचनासाठी ३० सें.मी. च्या अंतरावर इमीटर(ठिबक) असलेल्या इनलाईन लॅटरल्स (दोन लिटर प्रति तास क्षमतेच्या) गादी वाफ्यावर मधोमध टाकाव्यात. लॅटरलमधील गळती तपासावी. साधारणतः दोन लॅटरलमधील अंतर ७ फूट असावे.

मल्चिंग पेपरवरती लागवड असेल तर ठिबक तंत्राने जमिनीच्या प्रकारानुसार पाण्याचे नियोजन करावे. फळधारणेनंतर व फळांची वाढ होत असताना एक सारख्या प्रमाणात पाणी द्यावे. फळे परिपक्वतेवेळी पाण्याचे प्रमाण कमी करावे. त्यामुळे फळामधील साखरेचे प्रमाण व गराचे प्रमाण उत्तम राहते.

पिकाचा कालावधी – ९० ते १२० दिवस.

फळांची काढणी व उत्पादन –

- फळांची काढणी लागवडीनंतर ७०-७५ दिवसांनी चालू होते.
- फळांचा बाह्यरंग बदलल्यानंतर म्हणजेच हिरवा रंग जाऊन थोडेसे पिवळे झाल्यानंतर, फळाजवळच्या देठाविरुध्दची बाळी सुकल्यानंतर फळांची काढणी करावी. मल्चिंग, ठिबक सिंचन, गादीवाफा पध्दत वापरून सुधारीत पध्दतीने नियोजन केल्यास ४०-५० टन प्रति हेक्टरी उत्पादन घेणे सहज शक्य आहे. बारामतीने २०११-१२ पासून कलिंगड लागवडीमध्ये रोपवाटिका, मल्चिंग, बेडवर लागवड, ठिबकद्वारे पाणी व खत व्यवस्थापन या पध्दतींचा वापर करून शेतकयांच्या शेतावर कलिंगडाचे एकरी २२-२५ टन इतके उत्पादन घेतले आहे.

लेख संकलन

श्री. यशवंत जगदाळे
विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या),
कृषि विज्ञान केंद्र, बारामती

डॉ. सय्यद शाकीर अली
प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ,
कृषि विज्ञान केंद्र, बारामती

Agricultural Development Trust Baramati

कलिंगड
उत्पादन तंत्रज्ञान

निर्मिती अर्थसहाय्य :

प्रकल्प संचालक आत्मा, पुणे
कृषि भवन, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५
फोन : ०२०– २५५३०४३१
E-mail : pdatmapune@gmail.com

तांत्रिक लेखन व प्रकाशन:

कृषि विज्ञान केंद्र, बारामती
माळेगांव खुर्द, बारामती, पुणे – ४१३ ११
फोन : ०२११२-२५५२०७, २५५२२७
E-mail:kvkbmt@yahoo.com
Web: www.kvkbaramati.com

कलिंगड उत्पादन तंत्रज्ञान

कलिंगड यालाच टरबूज म्हणतात. उन्हाळ्यात तहान भागविण्यासाठी या फळाचा उपयोग होतो. कलिंगड या पिकाची लागवड व्यापारी तत्वावर मोठ्या प्रमाणात केली जाते.

हवामान व जमीन-

थंड व कोरडे हवामान या पिकास चांगले मानवते. साधारणतः कडक उन्हाळ्यात आणि पावसाळ्याचा काळ सोडला तर वर्षभर कलिंगडाची लागवड करता येते. वेलीच्या चांगल्या वाढीसाठी २४-२६ अंश सेल्सिअस तापमान फारच उपयुक्त असते.

या पिकास मध्यम काळी, पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६.५ ते ७ असावा.

सुधारीत जाती -

शुगर बेबी, अरका माणिक, अशाही यामाटो व अरका ज्योती या जातींचा वापर लागवडीसाठी केला जातो. तसेच खाजगी कंपनीच्या किरण-१, शुगर क्वीन, किरण-२ व पूनम या जातींचीही लागवड बयाच प्रमाणत केली जाते. एकरी ३५० ते ४०० ग्रॅम बियाणे लागते.

रोपवाटिका व्यवस्थापन -

यापुर्वी कलिंगडाची लागवड थेट बियाणे टोकूण केली जात होती. परंतू सध्याच्या नवीन पध्दतीनुसार प्लॅस्टीक ट्रे मध्ये (प्रो-ट्रे) वाढविलेल्या रोपांची पुर्नलागवड केली जाते. यामुळे वेलांचे योग्य प्रमाण, मजूर, पाणी आणि इतर निविष्ठांवर होणारा खर्च आणि वेळेचीही बचत होते.

- रोपे तयार करण्यासाठी साधारणतः ९८ कप्पे असलेला प्रो ट्रे वापरतात. यामध्ये कोकोपीट भरले जाते.
- कलिंगडासाठी २.५ ते ३ किलो बियाणे प्रति हेक्टरी लागते.
- बियाणे लागवडीपूर्वी कॅप्टन किंवा कार्बेन्डेझिम २.५ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात बियाण्यास चोळावे.
- कोकोपीट ट्रे मध्ये भरल्यानंतर यावर बोटांच्या सहाय्याने मध्यभागी एक खड्डा करावा. प्रत्येक कप्प्यात एक बी पेरुन कोकोपीटने झाकूण घ्यावे व पाणी द्यावे.
- यानंतर ८-१० ट्रे एकावर एक ठेवून काळ्या पॉलीथीन पेपरने झाकूण घ्यावेत, झाकल्यामुळे ओलावा निघून जात नाही व पाणी देण्याची गरज नसते यामुळे उबदारपणा टिकून राहील्यामुळे बी लवकर उगवून येते.
- रोपे उगवून आल्यानंतर ३-४ दिवसानंतर पेपर काढावा व ट्रे खाली उतरवून ठेवावेत.
- रोपे सडू नयेत म्हणून पेरणीनंतर दहाव्या दिवशी कॉपर ऑक्झिक्लोराईड किंवा हायड्रॉक्साईडची दोन ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात आळवणी करावी.
- नागअळी व रसशोषक किडींचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून ट्रायझोफॉस व इर्मिक्लोप्रीड ०.५ मिली/लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.
- १६ ते २४ दिवसात(पहिला फुटवा आल्यानंतर) रोंपांची पुर्नलागवड करावी.

लागवडीचे तंत्र -

- लागवडीचा हंगाम - उन्हाळा - जानेवारी ते मार्च पावसाळा जून ते ऑक्टोबर
- कलिंगडाची लागवड : २ मीटर ०.५ मीटर अंतरावर करावी.
- लागवडीसाठी ६० सें.मी. रुंद आणि १५ सें.मी. उंच गादीवाफे तयार करावेत.

खत व्यवस्थापन -

- लागवडीपुर्वी ५०:५०:५० किलो नत्र, स्फुरद, पालाश प्रति हेक्टरी व लागवडीनंतर एक महिन्याने ५० किलो नत्र हेक्टर मात्रा द्यावी.

(बेसल डोसमध्ये एकरी ५ टन शेणखत प्रति + ५०किलो डीएपी + ५० किलो म्यरेट ऑफ पोटॅश + ५० किलो १०:२६:२६ + २०० किलो निंबोळी पेंड + १० किलो झिंक सल्फेट मिसळावे. जमिनीच्या प्रतिनुसार खतांची मात्रा बदलते)

ठिबक सिंचनातून द्यावयाची विद्राव्य खत मात्रा-

पिकाची अवस्था	दिवस	खत प्रकार	ठिबकमार्फत प्रति एकर दिवसाड खत देण्याचे प्रमाण	खताची एकूण मात्रा एकरी
पुर्नलागवडीनंतर ८-१० दिवसांनी	१७-३२	१९:१९:१९ + युरिया	२ कि.ग्रॅम + ५०० कि.ग्रॅम	२५ कि.ग्रॅम १० कि.ग्रॅम
फुलोरा ते फळधारणा कालावधी	३५-५५	१२:६१:००	३ कि.ग्रॅम	२० कि.ग्रॅम
फळवाढीचा कालावधी	५६-६५	१३:००:४५	४ कि.ग्रॅम	१५ कि.ग्रॅम
पीक पक्वतेचा कालावधी साखर प्रमाण व चकाकी वाढविणेसाठी	६६-७५	००:००:५०	५ कि.ग्रॅम	१० कि.ग्रॅम
फळांची साठवणूक क्षमता वाढविणेसाठी	४१ दिवसापासून	कॅल्शियम	३ कि.ग्रॅम	३५ कि.ग्रॅम

माती परीक्षण अहवालानुसार खत नियोजन करावी

टिप : जमिनीच्या प्रतिनुसार खतांची मात्रा बदलते

सिल्व्हर मल्चिंग व पॉलीप्रॉपीलीन नॉन ओव्हन पेपरचा वापर :

गादीवाफ्यावर ठिबक अंथरल्यावर कलिंगड लागवडीपुर्वी १.२५ मीटर रुंद आणि ४०० मीटर लांब प्रति रोल(पेपरची जाडी ३० मायक्रॉन) या प्रकारातील मल्चिंग पेपर अंथरावा. यामुळे जमिनीचे तापमान, आर्द्रता अनुकूल राहून पांढया मुळ्यांची वाढ चांगली होते. पाण्याची बचत, तण नियंत्रण, खतांची बचत तसेच काहीशा प्रमाणात रसशोषक किडींचे नियंत्रण होते. एकरी मल्चिंग पेपर ४-५ रोल लागतात. रोपांची पुर्नलागवड करण्यासाठी ठिबक सिंचन, मल्चिंग, लॅटरल आणि मल्चिंग पेपर अंथरल्यानंतर कलिंगड लागवडीसाठी वाफ्याच्या मध्यभागी ६० सें.मी. अंतरावर १० सें.मी. व्यासाची छिद्रे तयार करावीत. दोन्ही बाजूने लागवड पध्दतीमध्ये मल्चिंग पेपर अंथरल्यानंतर २ इंची पाईपच्या तुकड्याच्या सहाय्याने ड्रीपरच्या दोन्ही बाजूला १० सें.मी. अंतरावर छिद्रे पाडावीत एकाच बाजूच्या दोन छिद्रामधील अंतर २ फूट ठेवावे. अशा पध्दतीने एकरी सुमारे ५४४० रोपे लागतात.